(26) (४) (5)

[विशेष–ध. आ./ मुं. सा. वि./५०म.

No 18886

सत्यमेव जयते

४

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक

महाराष्ट्र/१३९६/२०००/पुणे.

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी
........ [illegible] पेट्रोल पंप, विश्रांतवाडी पुणे

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१ )अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

तारीख २३-११-२००० रोजी माझ्या सहीनिशी दिले.

(स्वाक्षरी)
संस्थांचे सहायक निबंधक,
........ पुणे विभाग.

ASSISTANT REGISTRAR OF ... PUNE

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33. *M.E.S.*

PRINCIPAL
M. E. S.
New English Medium High School
Thergaon, Pune-411 033

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33. *M.E.S.*

Millennium Educational Society
Secretary
Ashok More

(27) (1) (6)

[विशेष-८ अ./मुं.सा.वि./२५

4

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम २९) या अन्वये पुणे विभाग, पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव : मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी, विश्रांतवाडी, पुणे - १५.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ - १८३१६ (पुणे)

श्री विजय जयसिंग पवार यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक २६/८/०२ ~~१९९~~ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही
सहायक धर्मादाय आयुक्त
पदनाम पुणे विभाग, पुणे

PRINCIPAL
M. E. S.
New English Medium High School
Thergaon, Pune-411 033

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL
THERGAON PUNE-33.
M.E.S.

Millennium Educational Society
Secretary
Ashok More

परिशिष्ट ' ब '

## संस्थेचे ज्ञापन

संस्थेचे नाव : ' मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी '

संस्थेचा पत्ता : बेंबिंद पेट्रोल पंप, विश्रांतवाडी, पुणे.

संस्थेचे कार्यक्षेत्र : महाराष्ट्र राज्य

ध्येय धोरण : आपला संपूर्ण देश सुशिक्षित, सुसंपन्न बनवायचा असेल तर आधी प्रथम प्रत्येक नागरिक हा साक्षर बनविला पाहिजे. शिक्षणामुळे माणसामध्ये आमुलाग्र बदल होत असतो म्हणून सरकार साक्षरता प्रसार, प्रौढ शिक्षण वर्ग , गांव तिथे शाळा अशासारख्या योजना राबविते. सरकारच्या अशा ध्येय धोरणाने प्रेरित होऊन अशा योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ' ' या नावाची संस्था स्थापन करू इच्छितो व त्यासाठी संस्था पुढील उद्देश राबवेल.

संस्थेचे उद्देश :

1. संस्थेच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात टप्प्याटप्प्याने शिक्षणसंस्था सुरू करणे, उदा. बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालये, तंत्रशाळा, अभियांत्रिकी, वैद्यकिय इ. शिक्षण संस्था सुरू करणे व शिक्षणाचा प्रचार करणे. मुलींसाठी शिक्षणसंस्था सुरू करणे. मुलींसाठी ट्रेनिंग स्कूल सुरू करणे तसेच आय.टी.आय. चे वर्ग सुरू करणे.
2. विद्यार्थ्यांकरीता वसतीगृहे, बोर्डिंग सुरू करणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्त्या सुरू करणे व त्यांना विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, खाऊ वाटप, कपडे वाटप, शै. साहित्य वाटप करणे.
3. वसतीगृहामध्ये सुसज्ज अभ्यासिका, वाचनालय, खेळासाठी क्रीडांगण व शारीरिक विकासासाठी अत्याधुनिक व्यायामशाळा सुरू करणे.
4. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, शारीरिक विकासाबरोबरच त्यांचे विशेष छंद जोपासण्याकरीता विविध वर्ग उदा. संगीत, वादन, अभिनय क्षेत्रात प्रशिक्षित शिक्षकांकडून त्यांना प्रशिक्षण देणे, मार्गदर्शन करणे व अशारीतीने त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे.
5. विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्याकरीता व्यवसाय मार्गदर्शन, चारित्र्य संवर्धन, व्यक्तिमत्व विकासासाठी विविध क्षेत्रातील प्रख्यात तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन पर व्याख्याने आयोजित करणे तसेच विविध वक्त्यांच्या व्याख्यानमाला, सभासंमेलने, चर्चासत्रे आयोजित करणे.
6. हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची संधी उपलब्ध करून देणे व त्यासाठी योग्य ती मदत व मार्गदर्शन करणे.
7. वरील सर्व उद्देशांशिवाय विविध सामाजिक व विधायक अशी कामे हाती घेतली जातील. उदा. रक्तदान शिबीरे, आरोग्य शिबीरे, हुंडाबंदी, दारूबंदी, व्यसनमुक्ती आंदोलने, भ्रष्टाचार-निर्मूलन, रूढी परंपराबाबत जनजागरण, राष्ट्रीय समस्या उदा. एड्स् निर्मूलन याबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे.
8. निरनिराळे राष्ट्रीय उत्सव साजरे करणे उदा. 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, महाराष्ट्र दिन व विविध थोर राष्ट्रीय पुढाऱ्यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे तसेच त्यांच्या थोर तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे, तसेच धार्मिक व सामाजिक सण साजरे करणे, शिशुसेवा, पाळणाघरे, अनाथाश्रम सुरू करणे.
9. लघुउद्योगांना पूरक असे इलेक्ट्रीकल, इंजिनिअरींग, ड्राफ्टिंग, टेलरिंग, फोटोग्राफी, प्रिंटींग इ. प्रकारचे तांत्रिक कोर्सेस सुरू करणे.
10. प्रशिक्षण केंद्र सुरू करणे उदा. शेळी व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्य व्यवसाय, शेती व्यवसाय, फलोत्पादन, दुग्ध व्यवसाय तसेच बालवाडी शाळा सुरू करणे.

TRUE COPY
Mr. ASHOK K. MORE
SECRETARY
EDUCATION SOCIETY

PRINCIPAL
M.E.S.
New English Medium High School
Thergaon, Pune-411 033

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33 M.E.S.

Millennium Educational Society
Secretary
Ashok More

5. सदरहू संस्थेच्या नियम व नियमावली नुसार ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपविली आहे अशा कार्यकारी मंडळातील पहिल्या सभासदांची संपूर्ण नाव व पत्ता, वय, व्यवसाय, पदे व राष्ट्रीयत्व पुढील प्रमाणे राहतील.

| अ.क्र. | सभासदांचे नाव व पत्ता | वय | व्यवसाय | पद | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. विजय जयसिंग पवार.<br>202/ए, सर्वत्र विहार, एम.इ.एस. कॉलनी<br>मुंबई पुणे रोड, खडकी, पुणे 3. | 42 | नोकरी | अध्यक्ष | भारतीय |
| 2. | श्री. अनिल रामचंद्र मोरे.<br>डी4/46, त्रिदल नगर, येरवडा, पुणे 6. | 37 | नोकरी | उपाध्यक्ष | भारतीय |
| 3. | श्री. अशोक रामचंद्र मोरे.<br>डी4/46, त्रिदल नगर, येरवडा, पुणे 6. | 29 | व्यापार | सेक्रेटरी | भारतीय |
| 4. | सौ. सुरेखा विजय पवार.<br>202/ए, सर्वत्र विहार, एम.इ.एस. कॉलनी<br>मुंबई पुणे रोड, खडकी, पुणे 3. | 35 | नोकरी | खजिनदार | भारतीय |
| 5. | सौ. अनिता अनिल मोरे.<br>डी4/46, त्रिदल नगर, येरवडा, पुणे 6. | 32 | गृहिणी | सदस्य | भारतीय |
| 6. | सौ. सविता अशोक मोरे.<br>डी4/46, त्रिदल नगर, येरवडा, पुणे 6. | 24 | गृहिणी | सदस्य | भारतीय |
| 7. | श्री. सुरेश जयसिंग पवार.<br>मु. भादसरळी, पो. कुमठे (आसनगाव)<br>सातारा. | 38 | शेती | सदस्य | भारतीय |
| 8. | × पंढरीनाथ रूपचंद पाटील<br>९२९/ब शाहीन कॉ. प्रभातरोड. | 30 | शेती | सदस्य | भारतीय |
| 9. | श्री. विश्वास रामचंद्र शेलार.<br>मु. लगडवाडी, पो. किकली ता. वाई,<br>जि. सातारा. | 40 | नोकरी | सदस्य | भारतीय |
| 10. | श्री. राजेंद्र मन्नुलाल कोकणे.<br>मोगलवाडी रोड, त्री बिल्डीग, खोपोली,<br>ता. खालापूर, जि. रायगड. | 31 | नोकरी | सदस्य | भारतीय |
| 11. | श्री. अजित श्रीपाल वाडकर.<br>स्वामी विवेकानंद नगर, कार्मील शाळेजवळ,<br>खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड. | 38 | नोकरी | सदस्य | भारतीय |

6. वरील आम्ही सर्व आम्हा सर्वांची ' मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी ' या नावाची संस्था स्थापन करू इच्छितो व संस्था नोंदणी अधिनियम सन 1860 अन्वये संस्था नोंदवू इच्छितो म्हणून आम्ही सर्व एकत्र येऊन आज दिनांक 25/12/2000 रोजी या ज्ञापनावर सहया करीत आहोत.

| अ.क्र. सभासदांचे नाव व पत्ता | सही |
|---|---|
| श्री. विजय जयसिंग पवार. | [signature] |
| श्री. अनिल रामचंद्र मोरे. | [signature] |
| श्री. अशोक रामचंद्र मोरे. | [signature] |
| सौ. सुरेखा विजय पवार. | [signature] |
| सौ. अनिता अनिल मोरे. | [signature] |
| सौ. सविता अशोक मोरे. | [signature] |
| श्री. सुरेश जयसिंग पवार. | [signature] |
| पंढरीनाथ रूपचंद पाटील | [signature] |

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33 *M.E.S.*

(3)

(30)

श्री. विश्वास रामचंद्र शेलार.

श्री. राजेंद्र मन्नुलाल कोकणे.

श्री. अजित श्रीपाल वाडकर.

---

वरील सर्व इसमांना मी ओळखत असून त्यांनी माझे समक्ष या ज्ञापनावर सहया केल्या आहेत. त्या मी ओळखतो.

स्थळ : पुणे

दिनांक : 24/12/2004

AZIM N. SAYED,
Advocate, Pune सी.ए.मॅ/वकील

सही व शिक्का

' प्र मा ण प त्र '

यावरून असे प्रमाणित करण्यात येते की, आमचे उत्तम माहिती व समजूती नुसार '

' मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी ' ' या नावाची अथवा या नावात साम्य असलेली दुसरी कोणतीही संस्था आमचे भागात किंवा परिसरात अस्तित्वात नाही किंवा संस्था नोंदणी अधिनियम सन 1860 अन्वये संस्था नोंदविण्यात आलेली नाही.

स्थळ : पुणे

दिनांक : 24/12/2004

THERGAON PUNE-33. *M.E.S.*

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |
|---|---|---|
| १. | १. | १. |

TRUE COPY

Mr. ASHOK R. MORE
SECRETARY
MILLENIUM EDUCATION SOCIETY

:: । ::

(31)

महाराष्ट्र / 9392/2000/पुणे
दिनांक- 23/12/2000

परिशिष्ट ' क '

संस्थेचे नियम व नियमावली

संस्थेचे नांव : " मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी "

संस्थेचा पत्ता : बेविंद पेट्रोल पंप, विश्रांतवाडी, पुणे.

1) संदर्भीय शब्दांची व्याख्या :

अ. संस्था : संस्था म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम 1860 व मु.सा.वि.व्य. अधिनियम 1950 अन्वये नोंदविण्यात येणारी संस्था.

ब. नियम व नियमावली : संस्था नोंदणी अधिनियम म्हणजे सन 1860 चा भारत सरकारचा कायदा व त्याखाली येणारे संस्था नोंदविण्यात येताना कार्यकारी मंडळाने तयार केलेले नियम.

क. कार्यकारी मंडळ : संस्थेचे कार्यकारी मंडळ म्हणजे संस्थेच्या नियम व नियमावली नुसार संस्था स्थापनेच्या वेळी व नंतर संस्थेच्या सर्वसाधारण सभेत निवडून येणारे मंडळ किंवा विश्वस्त की ज्याचे वर संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपविली आहे असे मंडळ अशा कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार व अन्य आवश्यक असल्यास इतर पदे प्रामुख्याने असतील.

ड. सभासद : संस्थेचे नियम व नियमावली मान्य असणारी व कार्यकारी मंडळाने प्रवेश दिलेली नियमीतपणे वर्गणी भरणारी व्यक्ती संस्थेचे सभासद म्हणून संबोधण्यात येईल.

इ. अनुसूची : या नियमावली सोबत जोडलेल्या स्वतंत्र अशा अनुसूची 1,2,6 की ज्या सन 1971 च्या संस्था नोंदणी महाराष्ट्राचे नियमाप्रमाणे आहेत.

फ. उद्देश : ज्ञापनपत्रात नमूद केलेले उददेश की ज्या करता संस्था स्थापन करण्यात येत आहे असे उद्देश.

2) संस्थेचे कार्यक्षेत्र :

संस्थेचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा / महाराष्ट्र राज्या पुरते मर्यादित राहील.

3) हिशोबाचे वर्ष :

संस्थेचे हिशोबाचे वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च असे राहील.

4) सभासदत्व व त्यांची नोंदणेची पध्दत :

संस्थेचे नियम व नियमावली तसेच ध्येय धोरणे मान्य असणारी व सामाजिक कार्याची आवड असलेल्या कोणत्याही सज्ञान व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येईल. परंतू सभासद होण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीने संस्थेकडे असणारा नमूना अर्ज, दोन सभासदांच्या शिफारशीसह व प्रवेश फी सह कार्यकारी मंडळाकडे पाठविला पाहिजे. कार्यकारी मंडळाने त्यास मंजूरी दिल्या नंतरच अर्जदार व्यक्तीस सभासदत्वाचे अधिकार प्राप्त होतील. सभासद करून घेणे अथवा नाही याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

5) सभासदांचे प्रकार :-

अ) संस्थापक सभासद ब) वर्गणीदार सभासद क) आजीव सभासद ड) देणगीदार किंवा हितचिंतक किंवा आश्रयदाते सभासद ई) सन्माननीय सभासद.

अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी

TRUE COPY
Mr. ASHOK R. MORE
SECRETARY
MILLENIUM EDUCATION SOCIETY

अ. संस्थापक सभासद : संस्था स्थापनेच्या वेळी संस्थेच्या ध्येय धोरणांनी प्रेरित होऊन संस्थे ज्ञापनावर सहया करणा-या सभासदांना संस्थापक सभासद समजणेत येई त्यांचे कडून प्रवेश फी रू. 5/- व वार्षिक वर्गणी रू.100/- घेण येईल.

ब. वर्गणीदार सभासद : जे सभासद प्रवेश फी रू. 5/- व संस्थेची मासिक वर्गणी रू. 1( किंवा वार्षिक वर्गणी रू. 100/- एकदम पूर्ण भरतील त्यांना वर्गणी सभासद संबोधण्यात येईल.

क. आजीव सभासद : जी व्यक्ती एकदम एकरकमी रू. 5000/- संस्थेला देईल त्याना आ सभासद संबोधण्यात येईल.

ड. देणगीदार किंवा आश्रयदाते सभासद : संस्थेला देणगीरूपाने किंवा वस्तूरूपाने देणगी देणा-या व्यक्तीला देणगी किंवा आश्रयदाते सभासद म्हणून संबोधण्यात येईल . परंतू अशा व्यक्त मतदानाचा अधिकार राहणार नाही तसेच ते निवडणूकीस पात्र रहा नाहीत.

ई. सन्माननीय सभासद : समाजातील वेगवेगळया क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तीस संस्थेचे सन्मान सभासदत्व बहाल करण्यात येईल. अशा सभासदांना देखील निवड लढविता येणार नाही व मतदान करता येणार नाही.

6) सभासदत्व रद्द होणे :

1) एखादया सभासदाचा मृत्यू झाल्यास.
2) संस्थेच्या एखादया सभासदाने राजीनामा दिल्यास व तो कार्यकारी मंडळाने स्विकारल सभासदत्व रद्द होईल.
3) संस्थेच्या हितास बाधक असे कृत्य केल्यास त्या सभासदास सदर कृत्याबद्दल खुलासा करण्य संधी देऊन सभासदत्व रद्द करण्याचा ठराव कार्यकारी मंडळाने सभेत मांडून नंतरच सभासद रद्द करण्यात येईल.
4) मंडळाची वर्गणी सलग तीन वर्षे न भरल्यास.
5) संस्थेच्या सभांस सतत गैरहजर राहिल्यास सभासदत्व रद्द होईल.

ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33.

7) वार्षिक सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार व कार्य :

संस्थेच्या नियमाप्रमाणे सभासदत्व प्राप्त झालेल्या व मतदानाचा अधिकार असलेल्या सर्व सभासदांची मि सर्वसाधारण सभा होईल. कोणत्याही परिस्थितीत संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून सहा महिन्य कार्यकारी मंडळाने अशी सर्व साधारण सभा बोलविली पाहिजे. कार्यकारी मंडळाने ती बोलविली न तर 3/5 सभासद एकत्र येऊन अशी सभा घेणे बाबत योग्य ते निर्णय घेऊ शकतील आणि त्यान होणा-या सभेत संमत झालेले ठराव कार्यकारी मंडळावर बंधनकारक राहतील.

अधिकार व कार्य :

वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमाखर्च, ताळेबंद अहवाल मा सर्वसाधारण सभेचा वृत्तात नाचूनं दाखविला जाईल तसेच पुढील वर्षासाठीचे अंदाजपत्रक तयार करणे या सर्वांच्या प्रति वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व सभासदांना दिल्या जातील. कार्यकारी मंडळाची नि करणे व निवडणूकीचे निकाल जाहीर करणे, पुढील वित्तीय वर्षासाठी चार्टर्ड अकौंटंट अथवा ॲथोरॉ ऑडिटर नेमणे, नियम व नियमावलीमध्ये दुरूस्ती असल्यास त्याला मान्यता देणे. उद्देशपूर्ती संस्थेच्या ध्येय व धोरणानुसार चर्चा करणे व निर्णय घेणे, अध्यक्षाच्या परवानगीने येणारी व सभासदांनी आगोदर नोटीस देऊन सभेपुढे आणलेली कामे करणे, त्याचप्रमाणे अशा सभेत वर्ष केलेल्या कामाचा आढावा घेण्यात येईल. संस्थेच्या सर्व बाबतीत या सभेचा निर्णय अंतिम समजण येईल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी

8) सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :

कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी , वेळी व ठिकाणी सेक्रेटरी अध्यक्षांच्या परवानगीने परिपत्रक काढून सर्वसाधारण सभा बोलावतील. अशा परिपत्रकामध्ये सभेचे स्थळ व तारीख नमूद केलेली असेल. अशा नोटीशीचे परिपत्रक प्रत्येक सभासदाला सभेपूर्वी १५ दिवस आगोदर मिळेल अशी व्यवस्था असेल. नियम व नियमावलीमध्ये दुरुस्ती असेल तर त्याची नोटीस कमीत कमी पंधरा दिवस आधी दिली पाहिजे. वार्षिक सभेची नोटीस स्थानिक वर्तमानपत्रातून दिल्यास उत्तम पण हि गोष्ट बंधनकारक राहणार नाही. सभेची नोटीस प्रत्येक सभासदाला पोस्टाने अथवा सही घेऊन देण्यात येईल. तथापि बाहेरगांवच्या सभासदांना सभेची नोटीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंगने पाठवूनही न मिळाल्यास सदर सभेत मंजूर झालेल्या कामकाजास त्याची बाधा येणार नाही. संस्थेला खरोखरी उपयोगी होतील अशा व्यक्तींना निमंत्रित व निरीक्षक म्हणून कायकारी मंडळाच्या सभेत मंजूरी घेऊन बोलाविता येईल पण त्यांना सभेच्या मतदानात भाग घेता येणार नाही. सभेला कोरम पटावरील एकूण सभासद संख्येच्या 3/5 एवढी आवश्यक गणसंख्या राहील. परंतू कोरम अभावी तहकूब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलाविली जाईल व अशा सभेस कोरमची आवश्यकता भासणार नाही व तिचे सर्व कामकाज कायदेशीर राहील पण वार्षिक सभेच्या नोटीशीत तशी सूचना आवश्यक राहील.

9) विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये :

कार्यकारी मंडळास सर्व सभासदांपुढे एखादी महत्त्वाची गोष्ट ठेवावयाची असल्यास अगर एखादया विशेष प्रसंगी सर्वसाधारण सभा बोलाविली जाईल त्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळण्यात येतील. तसेच पटावरील 2/3 सभासदांनी लेखी अर्ज केल्यास जादा सवसाधारण सभा अध्यक्षांनी बोलाविली पाहिजे.

10) संस्थेचे कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची रचना :

संस्थेचे ध्येय व उद्देश सफल करण्यासाठी व संस्थेचे कामकाज पहाण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत हजर असणा-या सभासदांमधून कमीत कमी ५ व जास्तीत जास्त १५ सभासदांचे कायकारी मंडळ पाच वर्षाकरीता निवडून दिले जाईल व असे कायकारी मंडळ आपल्या मधून पदाधिका-यांची निवड करतील. संस्थेचे पहिले कार्यकारी मंडळ हे नियुक्त राहील व त्यांची मुदत संस्था नोंदणी पासून पाच वर्षापर्यंत राहील. आवश्यक वाटल्यास जादा स्विकृत सभासद नेमण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. कार्यकारी मंडळ आपल्यामधून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार व आवश्यक वाटल्यास जादा पदाधिका-यांची नियुक्ती केली जाइल. व इतर कार्यकारी सभासद राहतील.

11) कायकारी मंडळाचा कायकाल व निवडणूकीची पध्दत :

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा पाच वर्षांचा राहील. दर पाच वर्षांनी संस्थेच्या एकूण मतदारांची यादी तयार करून सर्वसाधारण सभा बोलाविण्यात येईल व अशा सभेत सर्वसाधारण सभेचे सभासद नविन कार्यकारी मंडळाची निवड लोकशाही पध्दतीने / बहुमताने करतील. निवडणूकीची कायवाही जुन्या कायकारी मंडळाकडून केली जाईल. निवडणूक होण्यापूर्वी एक महिना आगोदर सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयात प्रसिध्द केली जाईल. ज्या सभासदांनी आपली वर्गणीची रक्कम पुणपणे भरलेली आहे असेच सभासद निवडणूकीत भाग घेण्यास पात्र ठरतील. समसमान मते पडल्यास अध्यक्ष आपल्या पसंतीचे मत (कास्टींग वोट) देतील. देणगीदार सभासदांना व सन्माननीय सभासदांना मतदानास हजर राहता येईल परंतू मतदानात भाग घेता येणार नाही

अध्यक्ष — उपाध्यक्ष — सेक्रेटरी

ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33.

(34)

14) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :

कार्यकारी मंडळाच्या सभासदांना सभेपूर्वी तीन दिवस आगोदर नोटीस पाठविणे आवश्यक आहे. पण तशाच प्रसंगी अध्यक्षांस फक्त एक दिवसाची समक्ष सही घेऊन नोटीस देऊन तातडीने सभा बोलाविण्याचा अधिकार राहील. पोस्टानें वेळेवर अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंगने पाठवलेली नोटीस एखादया सभासदास मिळाली नाही तर त्यामुळे बोलावलेली सभा बेकायदेशीर ठरणार नाही. विशेष प्रसंगी वेळेच्या अभावी एखादया तातडीच्या कामासाठी निर्णय घेणे झाल्यास सेक्रेटरी हा अध्यक्षांच्या परवानगीने कार्यकारीणीच्या सभासदाकडे लेखी मत मागवून घेईल व मताधिक्क्यावरून तो ठराव अगर निर्णय संमत वा असंमत झाला असे समजण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या सभेत 3/5 कोरम असावी पण कोरम अभावी तहकूब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलविली जाईल त्यास कोरमची आवश्यकता भासणार नाही.

15) कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीची नियम :

संस्थेच्या कार्यकारी मंडळाची मुदत 5 वर्षे राहील दर पाच वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत नविन कार्यकारीणीची निवड केली जाईल. सभेचे अध्यक्ष हेच अधिकारी म्हणून काम पहातील व निवडणूकीचा निकाल जाहीर करतील. ज्या वर्षी निवडणूक असेल त्या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे नोटीशीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करणेत येईल व उमेदवारी अर्ज मागविणेत येतील. कार्यकारी मंडळाची निवडणूक वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या मधून गुप्त मतदान पध्दतीने होईल.

16) कार्यकारी मंडळातील रिक्त पदाबाबत :

मृत्यु, राजीनामा अगर अन्य कारणाने कार्यकारी मंडळातील पद रिक्त झालेस कार्यकारी मंडळातील राहिलेले अन्य सदस्य बहुमताने भरतील. व तसा बदल अर्ज विहीत नमुन्यात मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सो. पुणे क्षेत्र यांना सादर करतील.

17) सभासदांचे हक्क व कर्तव्ये :

अ. सभासदाचे हक्क :

सर्व सभासदांना संस्थेच्या सर्वसाधारण सभेत उपस्थित राहून चर्चा करण्याचा व मतदानाचा हक्क राहील. व संस्थेच्या वेळोवेळी होणा-या कार्यक्रमांमध्ये सहभागी होता येईल तसेच लेखी सूचना, तक्रारी व दाद मागण्याचा अधिकार राहील. सभासदांनी आपली वर्गणी एक वर्षाच्या आत पूर्ण भरल्यास त्यांना मतदानाचा हक्क राहील. संस्थेच्या सभासदांना कमीत कमी 1/4 त्यापेक्षा जास्त सभासदांच्या संख्येने तातडीच्या सभा बोलविण्याचा हक्क राहील. संस्थेच्या वेळोवेळी होणा-या सभांच्या सूचना व वार्षिक अहवाल मिळण्याचा अधिकार राहील. संस्थेचा जमाखर्च व इतर आवश्यक माहिती विचारण्याचा हक्क राहील.

ब. सभासदाची कर्तव्ये :

संस्थेच्या प्रत्येक सभेला उपस्थित राहणे, संस्थेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करणे, पदाधिका-यांना सहकार्य करणे, सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होते वा नाही ते पहाणे, संस्थेच्या विकासाकरीता निधी उभारण्यास मदत करणे, संस्थेच्या विविध कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहकार्य करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी

35

12) कायकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :

अ. अध्यक्ष :

वार्षिक सर्वसाधारण सभा जादा सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळातील सभेचे अध्यक्ष पद स्विकारून निपःक्षपणे सभा पार पाडणे, समान मत विभागणी झाल्यास निर्णायक जादा मत देणे, संस्थेच्या एकुण कामकाजावर नियमीत देखरेख व नियंत्रण ठेवणे, चिटणीसांनी संस्थेचे कामकाज सुरळीत व नियमीत पार पाडले नाही तर स्वतःच्या अधिकारात संस्थेची वार्षिक सभा बोलविणे. संस्थेच्या कागदपत्रावर सहया करणे, संस्थेचे बँकखाते चालविणे,तसेच संस्थेच्या कामकाजाबाबत अंतिम निर्णय घेणे.

ब. उपाध्यक्ष :

अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षांची सर्व कामे करणे व इतरवेळी अध्यक्षांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मदत करणे.

क. सेक्रेटरी :

संस्थेच्या ध्येय धोरणानुसार व कार्यकारी मंडळाच्या सूचनेनुसार संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे, संस्थेचा पत्रव्यवहार व दफतर सांभाळणे, वेळच्या वेळी कार्यकारी मंडळाच्या व संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्षांच्या पुर्वपरवानगीने बोलाविणे, कार्यकारी मंडळ व संस्थेचा नोकरवर्ग यांचा दुवा म्हणून संबंध ठेवणे व त्यांच्या दैनंदिन कामावर देखरेख ठेवणे, संस्थेचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम पहाणे, संस्थेच्या सभांचे इतिवृत्त लिहिणे व कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना सभासदांना आवश्यक ती माहिती पुरविणे.

ड. खजिनदार :

संस्थेच्या दैनंदिन व वार्षिक जमाखर्चाचे कागदपत्र अद्यावत ठेवणे, सभासद वर्गणी, देणग्या, अनुदाने, व्याज इ. निधीचे व्यवहार चोख ठेवणे, संस्थेचे बँकखाते चालविणे, संस्थेचा आर्थिक व्यवहार सांभाळणे, मासिक व वार्षिक अंदाजपत्रक तयार करून कार्यकारी मंडळापुढे ठेवणे, संस्थेच्या दैनंदिन खर्चासाठी रूपये 500/ ते 1000/ रोख शिल्लक स्वतःकडे ठेवणे.

ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33. M.E.S.

ई. सदस्य :

संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभांना वेळोवेळी हजर राहणे, संस्थेच्या कामास सूचना, हरकती, मते मांडून चर्चा करणे तसेच इतर पदाधिकार्यांना त्यांच्या कामात मदत करणे व संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी सतत प्रयत्नशील राहणे.

13) कार्यकारी मंडळाच्या सभा व मागणीच्या सभा :

कार्यकारी मंडळाची सभा ही वर्षातून चार वेळा बोलविण्यात येईल व आवश्यक वाटल्यास जादा सभा बोलविण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील. अशा सभेची नोटी सभेपूर्वी किमान सात दिवस आगोदर अध्यक्षांना राहील. अशा सभेची नोटीस सभेपुर्वी किमान सात दिवस आ दर अध्यक्षांच्या संमतीने ..च्या सेवकामार्फत अगर टपालाने कार्यकारी मंडळाच्या सभासदांना पाठविण्यात येईल. नोटीसीमध्ये सभेची तारीख, वेळ व सभेपुढील कामकाजाचा विषय यांचा समावेश असेल. सभेस किमान 3/5 सभासदांची उपस्थिती आवश्यक राहील. गणसंख्ये अभावी अशी सभा तहकूब करावी लागल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेण्यात येईल अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

कार्यकारी मंडळाच्या 2/3 सभासदांनी लेखी अर्ज केल्यास किंवा कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवायची असल्यास अगर एखादया विशेष प्रसंगी कार्यकारी मंडळाची विशेष सभा अध्यक्ष बोलावतील अशा सभेत कार्यकारी मंडळाच्या सभेचे सर्व नियम पाळले जातील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी

(36)

कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :

संस्थेची सर्व विद्यमान स्थावर व जंगम मिळकत व पुढे वेळोवेळी वा अन्य मार्गाने मिळालेली मिळकत संस्थेच्या वतीने कार्यकारी मंडळाच्या ताब्यात राहील. स्थावर मिळकती पासून मिळणारे भाडे वा उत्पन्न वसूल करण्याचा तसेच जंगममिळकतीचे व्याज वा उत्पन्न वसूल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संस्थेचे ध्येय व उद्देश साध्य करण्याकरीता वा संस्थेचे कार्य चालविण्याकरीता मंजूर केलेल्या रकमेचा विनीयोग करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संस्थेचे कामकाज व्यवस्थित चालावे म्हणून नियम व पोटनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील व त्यावर नियंत्रण राहील. तसेच संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे, नोकरवर्गाची नेमणूक करणे, त्यांना निवृत्त करणे, संस्थेच्या देण्याघेण्याचे व्यवहार पहाणे, नविन उपसमित्या नेमणे, हिशोब तपासनिसाकडून जमाखर्च व ताळेबंद पत्रक तयार करून अहवाल तयार करून घेऊन वार्षिक सभा घेणे, संस्थेचे हिशोब सन 1860 च्या संस्था नोंदणी अधिनियमातील तरतूदी नुसार ठेवून त्यांचे परीक्षण चार्टड अकौंटंट अगर पब्लिक ऑडिटर कडून करवून घेऊन विहित नमुन्यामध्ये मा. संस्था निबंधक पुणे यांचे कार्यालयात दरवर्षी ठरविक मुदतीत पाठविण्याची तजविज करणे, पुढील कार्याची दिशा व अंदाजपत्रक तयार करणे, अंदाजपत्रक तयार करून वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे, संस्थेच्या सभासदत्वासाठी आलेल्या अर्जाचा विचार करून त्यावर निर्णय घेणे तसेच संस्थेच्या हितविरुध्द अगर ध्येय धोरणविरुध्द कार्य करणाऱ्या सभासदां विरुध्द योग्य ती कारवाई करणे व आवश्यक तर त्यांचे सभासदत्व रद्द करणे. वार्षिक सर्वसाधारण सभेने केलेले ठराव, आदेश व धोरण विषयक गोष्टी अंमलात आणणे, संस्थेने नेमलेल्या व्यक्तींची संबंधित माहिती वा विवरणे सन 1860 च्या संस्था नोंदणी नियम क्र. 8 अन्वये अनुसूची 2 च्या नमुन्यात मा. सहाय्यक संस्था निबंधक पुणे यांचेकडे वेळोवेळी पाठविणे.

19) संस्थेचा निधी , मिळकत व विनीयोग :

संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी सभासद वर्गणी , देणग्या, खाजगी व्यक्तीकडून तसेच शासकीय व निमशासकीय,अनुदाने याद्वारे मिळणारे उत्पन्न ह्या सर्व रकमा हा संस्थेचा निधी समजणेत येईल. तसेच देणगीरूपाने, करार खरेदी व अन्य मार्गाने मिळणारी स्थावर व जंगम मालमत्ता संस्थेची मिळकत समजण्यात येईल.

वरील मार्गाने मिळणारी रक्कम संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी व संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा पगार व इतर दैनंदिन गरजेसाठी वापरली जाईल. तसेच संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी व्यावसायिक स्वरूपाची मदत केली तर त्याचा मोबदला दिला जाईल. परंतू संस्थेच्या उत्पन्नातील फायदा सभासदांना मिळणार नाही.

20) उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद :

संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी संस्थेच्या एकूण उत्पन्नातून उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद पुढील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| ज्ञापनातील उद्दिदष्टांसाठी | 80 टक्के. |
| व्यवस्थापकिय उद्दिदष्टांसाठी | 20 टक्के. |

ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33 NEW M.E.S.

21) बँक खाते :

संस्थेचा सर्व निधी बँकेत अथवा सहकारी बँकेत संस्थेच्या नावे खाते उघडून ठेवला जाईल व हे खाते अध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार या तिघांपैकी कोणाही दोघांच्या संयुक्त सहीने चालविले जाइल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी

(37)

कर्ज किंवा ठेवी यासंबंधीची तरतूद :

संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल. त्यापूर्वी मु.सा.वि.व्य. 1950 चे कलम 36 व 35 प्रमाणे मे. धर्मादाय सह आयुक्त पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल. तसेच ठेवी स्विकारता येतील.

23) स्थावर मालमत्ता खरेदी व विक्री करणे संबंधीची तरतूद :-

संस्थेस योग्य वाटल्यास अथवा आवश्यक स्थावर मिळकत खरेदी करता येईल. तसेच संस्थेची मालमत्ता विकता येईल. त्याबाबतचा संपूर्ण अधिकार कार्यकारी मंडळास राहील. परंतू त्यासाठी संस्थेच्या कार्यकारी मंडळाला मु.सा.वि.व्य. सन 1950 चे कलम 36 अन्वये पूर्तता करून मे. धर्मादाय सह आयुक्त पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल.

24) नियम व नियमावली मध्ये बदल करण्याची तरतूद :-

कार्यकारी मंडळाने किंवा बहुसंख्य सभासदांने चालू नियम व नियमावलीमध्ये बदल किंवा दुरूस्ती सुचविली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या 3/5 बहुमताने असा ठराव मांडून मंजूर करण्यात येईल. मात्र घटना दुरूस्तीचा मसुदा प्रत्येक सभासदाला नोटीसी बरोबर पाठविला जाईल.

25) नांव आणि उद्देशातील बदल :

संस्थेचे नांव अथवा उद्देश यात बदल करावयाचा असेल अथवा दोन संस्थांचे विलीनिकरण करावयाचे असेल तर सन 1860 च्या संस्था नोंदणी कायदयातील कलम 12 किंवा 12 अ यातील असणा-या तरतूदी नुसार कार्यवाही करण्यात येईल.

26) सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :

1860 चे संस्था नोंदणी अधिनियम कलम 15 अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी 1971 चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम 15 प्रमाणे अनुसूची सहाचे नमुन्यात ठेवण्यात येईल.

1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 4 प्रमाणे व 1971 चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम 7 प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची एकच्या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावी लागेल.

1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम अ प्रमाणे 1971 चे संस्था नोंदणी महाराष्ट्राचे नियम 1860 प्रमाणे दरवषी संस्थेत नोकरी लावलेल्या व्यक्तीस नोकरी संबधी अटी, बाबतचे विवरण अनुसूची दोनच्या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावे लागेल.

27) संस्थेचे विसर्जन :

संस्थेचं विसर्जन करावयाचे झाल्यास 3/5 बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजूरी घ्यावी लागेल व संस्था नोंदणी सन 1860 चे अधिनियमातील कलम 13 व 14 प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही करण्यात येईल.

TRUE COPY
Mr. ASHOK R. MORE
SECRETARY
MILLENNIUM EDUCATION SOCIETY

दि. ला

असे प्रमाणित करण्यात येते की, मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही खरी व सत्य प्रत आहे.

सही शिक्का

स्थळ :- पुणे

दिनांक

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सेक्रेटरी

PRINCIPAL
M.E.S.
New English Medium High School
Thergaon, Pune 411 033

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33. M.E.S.

Millennium Educational Society
Secretary
Ashok More

(38) (8)

Asst. Charity Commissioner Pune

१

Exh.1

अर्ज क्र. 4-16/22 कलम
अर्जदाराचे नांव :- 308 पराग टोरे
नक्कलेचा अर्ज आला तो दिनांक 11-1-2022 20-9-2021
नक्कल तयार दि.:- } 19-1-2022
नक्कल दिली तो दि.:-

(१) परिशिष्ट – ३
(कानू १३(१) पहा)

CR No. 2502/21

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन ऑफिस येथे ठेवणेत आलेल्या रजिस्टरात नोंदविलेल्या पब्लिक ट्रस्टच्या केलेल्या नोंदीतील झालेल्या बदलाबाबत अगर इष्ट अशा करावयाच्या बदलाबाबत करावयाचा रिपोर्ट

अधिक्षक 19/01/2022
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

| | | |
|---|---|---|
| सार्वजनिक संस्थेचे नाव | : | मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी |
| सार्वजनिक संस्थेचा पत्ता | : | द्वारा न्यू इंग्लिश मिडीयम स्कुल, स. नं. ७पी(१), श्रीनगर, थेरगाव, पुणे – ४११ ०३३. |
| संस्था नोंदणी दिनांक | : | महा/१३१६/2000/पुणे. दिनांक २३/११/२००० |
| सार्वजनिक संस्थेचा नंबर | : | एफ/१८३१६ (पुणे). दिनांक २६/८/२००२ |

| बदलाचे स्वरूप | बदलाचे कारण | शेरे |
|---|---|---|
| परिशिष्ट १ च्या उताऱ्यावरून दिनांक २४/७/२०१६ ते दिनांक २९/८/२०२१ पर्यंत काम केलेल्या खालील विश्वस्तांच्या नावांची व पदांची नोंद कमी करण्यात यावी.<br><br>१. श्री. विजय जयसिंग पवार (अध्यक्ष) सी.१ डी., ब्रुकलेन, प्राईड वर्ल्डसिटी, डी. वाय. पाटील कॉलेज जवळ, चऱ्होली, पी. सी. एम. सी., पुणे – ४१२ १०५.<br><br>२.श्री. अशोक रामचंद्र मोरे (सेक्रेटरी) फ्लॅट नं. ३०५, बिल्डींग नं. ७, अंबानगरी, धानोरी रोड, विश्रांतवाडी, पुणे – ४११ ०१५.<br><br>३. सौ. सुरेखा विजय पवार (खजिनदार) सी.१ डी., ब्रुकलेन, प्राईड वर्ल्डसिटी, डी. वाय. पाटील कॉलेज जवळ, चऱ्होली, पी. सी. एम. सी., पुणे ४१२ १०५. | या संस्थेचे कामकाज ज्ञापन आणि नियमावली प्रमाणे चालते.<br><br>नियमावलीतील कलम (७) मध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळ निवडण्यात येईल, असे नमूद केले आहे.<br><br>कलम (१०) मध्ये सर्वसाधारण सभेतून कमीत कमी ११ (अकरा) व जास्तीत जास्त १५ (पंधरा) सभासदांचे कार्यकारी मंडळ ५ (पाच) वर्षांकरिता निवडून दिले जाईल, असे नमूद केले आहे.<br><br>कलम ११ मध्ये कार्य कारिणीचा कार्यकाल पाच वर्षांचा असेल व सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारी मंडळाची निवड लोकशाही पद्धतीने/ बहुमताने करण्यात येईल, असे नमूद आहे. | १. दि.२९/८/२०२१ च्या वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस.<br>२. नोटीस पाठवल्याचा पुरावा.<br>३. उपस्थित यादी.<br>४. दि.२९/८/२०२१ च्या सभेचा सभावृत्तांत.<br>५. ना–हरकतपत्रे.<br>६. विश्वस्तांची संमतीपत्रे.<br>७. मंजूर बदल अर्ज क्र. ६३१/१८,६३०/१८ व २००६/२०२० च्या आदेशासहीत प्रती.<br>८. बदल अर्ज क्रमांक १७४३/२०२१ ची प्रत.<br>९. सभासद यादी.<br>१०. ज्ञापन व नियम नियमावलीची प्रत.<br>११. अर्जदाराच्या ओळखपत्राची छायांकित प्रत व पत्त्याचा पुरावा. |

PRINCIPAL
M. E. S.
New English Medium High School
Thergaon, Pune-411033

New English Medium School Thergaon Pune-33 M.E.S.

Millennium Educational Society
Secretary
Ashok More

२

| | | |
|---|---|---|
| ४. श्री. सुरेश जयसिंग पवार<br>मु. माटरमळी, पो. कुमठे<br>(आसनगाव), सातारा.<br><br>५. श्री. जयवंत मधुकर बाबर<br>ए-१-१४, टिळक रेसिडेन्सी,<br>इंद्रायणीनगर, भोसरी,<br>पुणे - ४११ ०२६.<br><br>६. श्री. विलास रामचंद्र शेलार<br>लक्ष्मी टाऊनशिप ३,<br>बी-२०३, कलश, विश्रांतवाडी,<br>पुणे - ४११ ०१५.<br><br>७. श्री. निलेश तुलसीराम<br>पलधामोल<br>ए-२-७, सुखवानी इंपरियल,<br>अजमेरा, मोरवाडी रोड, पिंपरी,<br>पुणे - ४११ ०१८.<br><br>८. श्री. रमेश वन्नप्पा पाटील<br>सेक्टर २९, प्लॉट नं. ७-२६,<br>चैतन्य पार्क, डी. वाय. पाटील<br>कॉलिज रोड, निगडी,<br>प्राधिकरण, पुणे - ४४.<br><br>९. सौ. नयना रणजित माने<br>बिल्डींग नं. बी-५, फ्लॅट नंबर<br>२०१, तिरुपती, काशीगंगा,<br>धानोरी रोड, पुणे - ४११ ०१५.<br><br>१०. सौ. निलम रोहित मोरे<br>७०२ 'ए' विंग, म्हाळसा हाईट,<br>सेक्टर नं. १९,<br>ऐरोली - ४०० ७०८.<br><br>परिशिष्ट १ च्या उताऱ्यावरून दिनांक १७/१०/२०२० ते दिनांक २९/८/२०२१ पर्यंत काम केलेल्या खालील विश्वस्तांच्या नावाची नोंद कमी करण्यात यावी.<br><br>११. श्री. विनायक विजय पवार<br>फ्लॅट नं. १०४, बिल्डींग नं. ७,<br>अंबानगर, धानोरी रोड,<br>विश्रांतवाडी, दिघी,<br>पुणे - ४११ ०१५. | मागील विश्वस्तांचा कालावधी संपत आल्यामुळे दिनांक २९/८/२०२१ च्या वार्षिक सर्व साधारण सभेत पुढील ५ (पाच) वर्षांसाठी म्हणजेच सन २०२१ ते सन २०२६ या कालावधी करिता कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. | |

Asst. Charity Commissioner Pune

| | | |
|---|---|---|
| परिशिष्ट १ च्या उताऱ्यावर खालील विश्वस्तांच्या नावांची नोंद दिनांक २९/८/२०२१ ते सन २०२६ या पाच (५) वर्षाकरिता करण्यात यावी.<br><br>१. श्री. विजय जयसिंग पवार<br>सी.१ डी., ब्रुकलेन, प्राईड वर्ल्डसिटी, डी. वाय. पाटील कॉलेज जवळ, चऱ्होली, पी. सी. एम. सी., पुणे – ४१२ १०५.<br><br>२. श्री. अशोक रामचंद्र मोरे<br>फ्लॅट नं. ३०५, बिल्डींग नं. ७, अंबानगरी, धानोरी रोड, विश्रांतवाडी, पुणे – ४११ ०१५.<br><br>३. सौ. सुरेखा विजय पवार<br>सी.१ डी., ब्रुकलेन, प्राईड वर्ल्डसिटी, डी. वाय. पाटील कॉलेज जवळ, चऱ्होली, पी. सी. एम. सी., पुणे – ४१२ १०५.<br><br>४. श्री. निलेश तुलसीराम पलधामोल<br>ए–२–७, सुखवानी इंपरियल, अजमेरा, मोरवाडी रोड, पिंपरी, पुणे – ४११ ०१८.<br><br>५. श्री. सुरेश जयसिंग पवार<br>मु. भाटरमळी, पो. कुमठे (आसनगाव), सातारा.<br><br>६. श्री. जयवंत मधुकर बाबर<br>ए–१–१४, टिळक रेसिडेन्सी, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे – ४११ ०२६.<br><br>७. श्री. रमेश वन्नप्पा पाटील<br>सेक्टर २९, प्लॉट नं. ७–२६, चैतन्य पार्क, डी. वाय. पाटील कॉलेज रोड, निगडी, प्राधिकरण, पुणे – ४४. | | |

New English Medium School Thergaon Pune-33 M.E.S.

41

४ 6

| | | |
|---|---|---|
| ८. श्री. विलास रामचंद्र शेलार<br>लक्ष्मी टाऊनशिप ३,<br>बी-२०३, कलश, विश्रांतवाडी,<br>पुणे - ४११ ०१५.<br><br>९. सौ. नयना रणजित माने<br>बिल्डींग नं. बी-५, फ्लॅट नंबर<br>२०१, तिरूपती, काशीगंगा,<br>धानोरी रोड, पुणे - ४११ ०१५.<br><br>१०. सौ. निलम रोहित मोरे<br>७०२ 'ए' विंग, म्हाळसा<br>हाईट, सेक्टर नं. १९,<br>ऐरोली - ४०० ७०८.<br><br>११. श्री. विनायक विजय पवार<br>फ्लॅट नं. १०४, बिल्डींग<br>नं. ७,अंबानगर, धानोरी रोड,<br>विश्रांतवाडी, दिघी,<br>पुणे - ४११ ०१५. | | |

दिनांक :२० / ९/२०२१
स्थळ : पुणे

(विजय जयसिंग पवार)

मी, उपनिर्दिष्ट श्री. विजय जयसिंग पवार, राहणार फ्लॅट नं. १०४, बिल्डींग नं. ७, अंबानगर, धानोरी रोड, विश्रांतवाडी, दिघी, पुणे - ४११ ०१५, प्रतिज्ञापूर्वक इकरार करतो की व सांगतो की, वरील अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या उत्तम माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

पुणे येथे प्रतिज्ञापूर्वक इकरार केला.

दिनांक :२०/ ९/२०२१
स्थळ : पुणे

(विजय जयसिंग पवार)

मी अर्जदारास ओळखतो / ओळखते

(संस्थतर्फे वकील)

Solemnly affirmed before me
that the facts mentioned in
application are true to the
best of his information and belief
by Smt/Shri विजय जयसिंग पवार
who is identified before me
by Adv./ID आरव्यी पाटील 5997 7040 5222
Whom I personally Known
Date : 20/9/2021

Superintendent
Public Trust Registration Office
Pune Region, Pune

(42)

7

## मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त-३, पुणें विभाग, पुणे यांचेसमोर

बदल अर्ज क्र :- २५०२/२०२१.
न्यासाचे नाव :- मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी
नोंदणी क्र :- एफ - १८३१६/पुणे
कलम :- २२

### नि.क्र.१ वरील आदेश
दि.१३/१२/२०२१

१. प्रस्तुतचा बदल अर्ज अर्जदारांनी म.सा.वि.व्य.अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये विश्वस्त बदलाची नोंद परीशिष्ट-१ वर घेणेकरीता दाखल केलेला आहे. अर्ज वादरहित आहे.

२. अर्ज नि.क्र.१ चे अवलोकन केले असता, न्यासाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९/०८/२०२१ रोजी होऊन अर्जात नमुद विश्वस्तांचा कालावधी पुर्ण झाल्यामुळे त्यांची नावे कमी करुन नविन विश्वस्तांची निवड सन २०२१ ते २०२६ या कालावधीकरीता करण्यात आली. त्यानुसार झालेल्या बदलाची नोंद परीशिष्ट-१ वर घेणेकरीता प्रस्तुतचा बदल अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्ज दाखल करणेस झालेला विलंब, निकरकोळ विलंब अर्जावरील आदेशानुसार सशुल्क माफ करणेत आलेला आहे. अर्जदाराने आदेशाची पुर्तता केलेली आहे.

४. अर्जदाराने अर्जासोबत सभेची नोटीस, नोटीस पोहोच, सभा उपस्थितीसह सभेचे इतिवृत्त, जुन्या कार्यकारीणीतून कमी केलेल्या विश्वस्तांचे नाहरकतपत्र, नवनियुक्त विश्वस्तांचे संमतीपत्र, न्यासाच्या नियम-नियमावलीची छायांकीत प्रत, मागील मंजूर बदल अर्जाची छायांकीत प्रत, अर्जातील कथनाच्या पृष्ठयार्थ अर्जदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र, पुरावा संपल्याचे पुरसिस इ.कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

५. नि.क्र. १ नुसार कळविलेला बदल व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदर बदल हा न्यासाच्या नियम-नियमावलीस अनुसरुन केला असल्यामुळे झालेला बदल वैध व कायदेशीर असल्याचे दिसुन येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करते.

### आदेश

१. बदल अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. परिशिष्ट १ वर नोंद घेण्यात यावी.

ठिकाण :- पुणे
दि :-१३/१२/२०२१.

(रा.प्र.मुक्कावार)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त-३
पुणे विभाग, पुणे

मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजवात केली

सही शिक्क्याची खरी नक्कल
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

Seen
(Adv for Society)

अर्ज क्र. 4/6/22 कलम
अर्जदाराचे नांव :- अॅड पराग एरंडे
नक्कलेचा अर्ज आला तो दिनांक 11-1-2022
नक्कल तयार दि.:- 19-1-2022
नक्कल दिली तो दि.:-

18/01/2022
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

C.R.-1743/21
Exh.1

परिशिष्ट - ३
(कानू १३(१) पहा)

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन ऑफिस येथे ठेवणेत आलेल्या रजिस्टरांत नोंदविलेल्या पब्लिक ट्रस्टच्या केलेल्या नोंदीतील झालेल्या बदलाबाबत अगर इष्ट अशा करावयाच्या बदलाबाबत करावयाचा रिपोर्ट

| | | |
|---|---|---|
| सार्वजनिक संस्थेचे नाव | : | मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी |
| सार्वजनिक संस्थेचा पत्ता | : | द्वारा न्यू इंग्लिश मिडीयम स्कुल, स. नं. ७पी(१),श्रीनगर, थेरगाव, पुणे - ४११ ०३३. |
| संस्था नोंदणी दिनांक | : | महा/१३१६/२०००/पुणे. दिनांक २३/११/२००० |
| सार्वजनिक संस्थेचा नंबर | : | एफ/१८३१६ (पुणे). दिनांक २६/८/२००२ |

| बदलाचे स्वरूप | बदलाचे कारण | शेरे |
|---|---|---|
| **परिशिष्ट १ च्या उताऱ्यावरून दिनांक २४/७/२०१६ ते दिनांक २५/३/२०२१ पर्यंत काम केलेल्या खालील विश्वस्ताच्या नावाची व पदाची नोंद कमी करण्यात यावी.**<br><br>श्री. अनिल रामचंद्र मोरे.<br>(उपाध्यक्ष)<br>डी ४/४६, त्रिदलनगर, येरवडा, पुणे - ४११ ००६. | संस्थेचे कामकाज ज्ञापन आणि नियमावली प्रमाणे चालते.<br><br>सदर बदल अर्जातील रकाना क्रमांक १ मध्ये नमुद केलेले श्री अनिल रामचंद्र मोरे यांची मंजूर बदल अर्ज क्रमांक ६३१/२०१८ व ६३०/२०१८ अन्वये सन २०१६ ते सन २०२१ या ५ (पाच) वर्षाकरिता विश्वस्त व उपाध्यक्ष म्हणून संस्थेच्या परिशिष्ट १ च्या उताऱ्यावर नोंद आहे.<br><br>श्री. अनिल रामचंद्र मोरे यांचे दिनांक २५/३/२०२१ रोजी निधन झाले.<br><br>दिनांक ८/४/२०२१ रोजी संस्थेची कार्यकारी मंडळाची सभा होऊन सदर सभेत श्री. | १. दि.८/४/२०२१ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेची नोटीस.<br>२. नोटीस पाठवल्याचा पुरावा.<br>३. उपस्थित विश्वस्त यादी.<br>४. दि. ८/४/२०२१ च्या सभेचा सभावृत्तांत.<br>५. श्री. अनिल रामचंद्र मोरे. यांचे मृत्यु प्रमाणपत्र.<br>६. मंजूर बदल अर्ज क्रमांक ६३१/२०१८ व ६३०/२०१८ च्या आदेशा सहीत प्रती.<br>७. दिरंगाई अर्ज.<br>८. ज्ञापन व नियम नियमावलीची प्रत.<br>९. अर्जदाराच्या ओळखपत्राची छायांकित प्रत व पत्याचा पुरावा. |

New English Medium School, Thergaon, Pune-33 M.E.S.

Asst. Charity Commissioner Pune

(५५)

२

५

| | | |
|---|---|---|
| | अनिल रामचंद्र मोरे यांचे नाव व पद संस्थेच्या परिशिष्ट १ च्या उताऱ्यावरून कमी करण्याचे ठरले. | |

दिनांक : ५/७/२०२१
स्थळ : पुणे

(विजय जयसिंग पवार)

मी, उपनिर्दिष्ट श्री. विजय जयसिंग पवार, राहणार फ्लॅट नं. १०४, बिल्डींग नं. ७, अंबानगर, धानोरी रोड, विश्रांतवाडी, दिघी, पुणे – ४११ ०१५, प्रतिज्ञापूर्वक इकरार करतो की व सांगतो की, वरील अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या उत्तम माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

पुणे येथे प्रतिज्ञापूर्वक इकरार केला.

दिनांक : ५/७/२०२१
स्थळ : पुणे

(विजय जयसिंग पवार)

Solemnly affirmed before
that the facts mentioned
application are true to the
best of his information and belief
by Smt/Shri विजय जयसिंग पवार
Who is identined before me
by Adv.HD ५५९६ ६०४० ५२२६
Whom I personally Known
Date : ५/६/२०२१

०५/०७/२१
Superintendent
Public Trust Registration Office
Pune Region, Pune

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33. MES

45

## मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त-३, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर

बदल अर्ज क्र :- १७४३/२०२१.
न्यासाचे नाव :- मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी
नोंदणी क्र :- एफ - १८३१६/पुणे
कलम :- २२

### नि.क्र.१ वरील आदेश
दि.१३/१२/२०२१

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी म.सा.वि.व्य.अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये विश्वस्तबदलाची नोंद परीशिष्ट-१ वर घेणेकरीतादाखल केलेला आहे. अर्ज वादरहित आहे.

२. अर्ज नि.क्र.१ चे अवलोकन केले असता, न्यासाची विश्वस्त मंडळाची सभा दि. ०८.०४.२०२१ रोजी होऊन अर्जात नमुद न्याचे उपाध्यक्ष श्री. अनिल रामचंद्र मोरे यांचा मृत्यु झाल्यामुळे त्यांचे नाव विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले, त्यानुसार झालेल्या बदलाची नोंद परीशिष्ट-१ वर घेणेकरीता प्रस्तुतचा बदल अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्ज दाखल करणेस झालेला विलंब, किरकोळ विलंब अर्जावरील आदेशानुसार माफ करणेत आलेला आहे.

४. अर्जदाराने अर्जासोबत सभेची नोटीस, नोटीस पोहोच, सभा उपस्थितीसह सभेचे इतिवृत्त, मयत विश्वस्तांचे मृत्युप्रमाणपत्र, न्यासाच्या नियम-नियमावलीची छायांकीत प्रत, मागील मंजूर बदल अर्जाची छायांकीत प्रत, अर्जातील कथनाच्या पृष्ठयार्थ अर्जदारांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र, पुरावाबंद पुरसिसइ.कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

५. नि.क्र. १ नुसार कळविलेला बदल व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदर बदल हा न्यासाच्या नियम-नियमावलीस अनुसरुन केला असल्यामुळे झालेला बदल वैध व कायदेशीर असल्याचे दिसुन येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करते.

### आदेश

१. बदल अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. परिशिष्ट १ वर नोंद घेण्यात यावी.

ठिकाण :- पुणे
दि :-१३/१२/२०२१.

13/12/2021
(रा.प्र.मुक्कावार)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त-३
पुणे विभाग, पुणे

मी नक्कल तयार केली
मी तपासली
मी रुजवात केली

सही शिक्क्याची खरी नक्कल
/01/2022
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

PRINCIPAL
M. E. S.
New English Medium High School
Thergaon, Pune-411033

Page 1 of 1

Millennium Educational Society
Secretary
Ashok More

(46) Exh-1 (9)

मा २१ ३१ ३१-(३)
११/०५/२२

अर्ज क्र. 3533 कलम ३७ 'a' 2 3
अर्जदाराचे नांव
नकलेचा अर्ज आला तो दिनांक 27-04-2022
नकल तयार दि.:-
नकल दिली तो दि. 28-04-2022

परिशिष्ट - ३
(कानू १३(१) पहा)

CR No-8 565/22

प्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन ऑफिस येथे ठेवणेत आलेल्या रजिस्टरांत नोंदविलेल्या पब्लिक ट्रस्टच्या केलेल्या नोंदीतील झालेल्या बदलाबाबत अगर इष्ट अशा करावयाच्या बदलाबाबत करावयाचा रिपोर्ट

| | | |
|---|---|---|
| सार्वजनिक संस्थेचे नाव | : | मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी |
| सार्वजनिक संस्थेचा पत्ता | : | द्वारा न्यू इंग्लिश मिडीयम स्कुल, स. नं. ७पी(१), श्रीनगर, थेरगाव, पुणे - ४११ ०३३. |
| संस्था नोंदणी दिनांक | : | महा/१३१६/२०००/पुणे. दि. २३/११/२००० |
| सार्वजनिक संस्थेचा नंबर | : | एफ/१८३१६ (पुणे), दि. २६/८/२००२ |

28.4.2022
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

| बदलाचे स्वरूप | बदलाचे कारण | शेरे |
|---|---|---|
| **परिशिष्ट १ च्या उताऱ्यावर नोंद असलेल्या खालील विश्वस्तांच्या नावांपुढे त्यांच्या पदांची नोंद दिनांक ३१/१२/२०२१ ते सन २०२६ या ५ (पाच) वर्षांकरिता करण्यात यावी.**<br><br>१. श्री. विजय जयसिंग पवार (अध्यक्ष)<br><br>२. श्री. निलेश तुलसीराम पलघामोल (उपाध्यक्ष)<br><br>३. श्री. अशोक रामचंद्र मोरे (सेक्रेटरी)<br><br>४. सौ. सुरेखा विजय पवार (खजिनदार) | दिनांक २९/८/२०२१ रोजी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण समेत नियमावलीतील कलम १० व ११ अन्वये सन २०२१ ते सन २०२६ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. या संबंधीचा मंजूर बदल अर्ज क्र. २५०२/२०२१ असा आहे.<br><br>नियमावलीतील कलम १० मध्ये कार्यकारी मंडळ आपल्यामधून पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करतील, असे नमूद आहे.<br><br>दिनांक ३१/१२/२०२१ रोजी कार्यकारी मंडळाची सभा होऊन सदर समेत वर उल्लेख केलेल्या कलमास अनुसरून पुढील ५ (पाच) वर्षांकरिता म्हणजेच सन २०२१ ते सन २०२६ करिता चार पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली त्यांची नावे व पदे या बदल अर्जातील रकाना क्रमांक १ मधे दर्शविलेली आहेत. | १. दि.३१/१२/२०२१ च्या कार्यकारी मंडळाची समेची नोटीस.<br>२. नोटीस पाठवल्याचा पुरावा.<br>३. उपस्थित विश्वस्त यादी.<br>४. दिनांक ३१/१२/२०२१ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत.<br>५. पदाधिकाऱ्यांची संमतीपत्रे.<br>६. मंजूर बदल अर्ज क्रमांक २५०२/२०२१ ची आदेशासहीत प्रत.<br>७. ज्ञापन व नियम नियमावलीची प्रत.<br>८. अर्जदाराच्या ओळखपत्राची छायांकित प्रत व पत्त्याचा पुरावा. |

Asst. Charity Commissioner Pune

PRINCIPAL
M. E. S.
New English Medium High School
Thergaon, Pune-411 033

दिनांक : १४/२/२०२२
स्थळ : पुणे

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33 M.E.S.

Millennium Educational Society
Secretary
(अशोक रामचंद्र मोरे)
Ashok More

47

२

मी, उपनिर्दिष्ट श्री. अशोक रामचंद्र मोरे, राहणार फ्लॅट नं. ३०५, बिल्डिंग नं. ७, अंबानगर, धानोरी रोड, धानोरी लेक विश्रांतवाडी पुणे - ४११ ०१५, प्रतिज्ञापूर्वक इकरार करतो की व सांगतो की, वरील अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या उत्तम माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

पुणे येथे प्रतिज्ञापूर्वक इकरार केला.

दिनांक : १४/२/२०२२
स्थळ : पुणे

Ashok

(अशोक रामचंद्र मोरे)

मी अर्जदारास ओळखतो/ओळखते

BBande

(संस्थेतर्फे वकील)

Asst. Charity Commissioner
Pune

Solemnly affirmed before me
that the facts mentioned in
application are true to the
best of his information and belief
by Sau/Shri Ashok R. More
who is identified before me
by Adv./ID Bhagyashree Bande
Whom I personally Known
Date : 14/2/2022

Superintendent
Public Trust Registration Office
Pune Region, Pune

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL
THERGAON
PUNE-33
M.E.S.

(3)

## मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त-३, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर

**बदल अर्ज क्रमांक : ५६५/२०२२**
(महाराष्ट्र सा.वि.व्य.अधि. १९५० चे कलम २२)

न्यासाचे नांव : मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी,
श्रीनगर, थेरगांव, पुणे.

नोंदणी क्रमांक : एफ/ १८३१६ /पुणे.

**नि.क्र.१ वरील आदेश**
**(दिनांक :२४/०३/२०२२)**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी मु.सा.वि.व्य.अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये कार्यकारी मंडळामधील बदलाची नोंद परीशिष्ट-१ वर घेणेकरीता दाखल केलेला आहे. अर्ज वादरहित आहे.

२. अर्ज नि.क्र.१ चे अवलोकन केले असता, न्यासाच्या दिनांक २९/०८/२०२१ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सन २०२१ ते २०२६ या कालावधीकरिता कार्यकारी मंडळाची निवड करण्यांत आली. तदनंतर दिनांक ३१/१२/२०२१ रोजी कार्यकारी मंडळाची सभा होवून सदर सभेमध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार या पदाधिका-यांची निवड करणेत आली. त्यानुसार झालेल्या बदलाची नोंद परिशिष्ट एकवर होण्याकरिता प्रस्तुतचा बदल अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्जदाराने अर्जासोबत ज्ञापन व नियमावलीची प्रत, सभेची नोटीस, नोटीस पोहोच, सभेच्या उपस्थितीसह इतिवृत्ताची प्रत, नविन पदाधिका-यांची संमत्तीपत्रे, अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ अर्जदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र, पुरावा संपल्याची पुरसिस इ.कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

Asst. Charity Commissioner * Pune *

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL * M.E.S. * THERGAON PUNE-33

(४९)

४. नि.क्र. १ नुसार कळविलेला बदल व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदर बदल हा न्यासाच्या नियम-नियमावलीस अनुसरुन केला असल्यामुळे झालेला बदल वैध व कायदेशीर असल्याचे दिसुन येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करते.

## आदेश

१. बदल अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. परिशिष्ट १ वर नोंद घेण्यात यावी.

ठिकाण :- पुणे
दि :- २४/०३/२०२२.

Asst. Charity Commissioner Pune

24/03/2022
(रा.प्र.मुक्कावार)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त-३
पुणे विभाग, पुणे

सही शिक्क्याची खरी नक्कल

मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजवात केली

28.4.2022
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33. *M.E.S.*

50 Exh-1

अर्ज क्र. 3533 कलम २२
अर्जदाराचे नांव 22 ०२२
नकलेचा अर्ज आला तो दिनांक 27-04-2022
नक्कल तयार दि.:- 28-04-2022
नकल दिली तो दि. 28-04-2022

मा 21 2022 (9)

परिशिष्ट - ३
(कानू १३(१) पहा)

प्रब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन ऑफिस येथे ठेवणेत आलेल्या रजिस्टरांत नोंदविलेल्या पब्लिक ट्रस्टच्या केलेल्या नोंदीतील झालेल्या बदलाबाबत अगर इष्ट अशा करावयाच्या बदलाबाबत करावयाचा रिपोर्ट

CR No- 8 565/22

सार्वजनिक संस्थेचे नाव : मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी

सार्वजनिक संस्थेचा पत्ता : द्वारा न्यू इंग्लिश मिडीयम स्कुल, स. नं. ७पी(१), श्रीनगर, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.

संस्था नोंदणी दिनांक : महा/१३१६/२०००/पुणे. दि. २३/११/२०००

सार्वजनिक संस्थेचा नंबर : एफ/१८३१६ (पुणे), दि. २६/८/२००२

28.4.2022
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

| बदलाचे स्वरूप | बदलाचे कारण | शेरे |
|---|---|---|
| **परिशिष्ट १ च्या उताऱ्यावर नोंद असलेल्या खालील विश्वस्तांच्या नावांपुढे त्यांच्या पदांची नोंद दिनांक ३१/१२/२०२१ ते सन २०२६ या ५ (पाच) वर्षांकरिता करण्यात यावी.**<br><br>१. श्री. विजय जयसिंग पवार (अध्यक्ष)<br><br>२. श्री. निलेश तुलसीराम पलघामोल (उपाध्यक्ष)<br><br>३. श्री. अशोक रामचंद्र मोरे (सेक्रेटरी)<br><br>४. सौ. सुरेखा विजय पवार (खजिनदार) | दिनांक २९/८/२०२१ रोजी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नियमावलीतील कलम १० व ११ अन्वये सन २०२१ ते सन २०२६ या पाच वर्षांच्या कालावधीकरिता कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. या संबंधीचा मंजूर बदल अर्ज क्र. २५०२/२०२१ असा आहे.<br><br>नियमावलीतील कलम १० मध्ये कार्यकारी मंडळ आपल्यामधून पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करतील, असे नमूद आहे.<br><br>दिनांक ३१/१२/२०२१ रोजी कार्यकारी मंडळाची सभा होऊन सदर सभेत वर उल्लेख केलेल्या कलमास अनुसरून पुढील ५ (पाच) वर्षांकरिता म्हणजेच सन २०२१ ते सन २०२६ करिता चार पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली त्यांची नावे व पदे या बदल अर्जातील रकाना क्रमांक १ मधे दर्शविलेली आहेत. | १. दि.३१/१२/२०२१ च्या कार्यकारी मंडळाची सभेची नोटीस.<br>२. नोटीस पाठवल्याचा पुरावा.<br>३. उपस्थित विश्वस्त यादी.<br>४. दिनांक ३१/१२/२०२१ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत.<br>५. पदाधिकाऱ्यांची संमतीपत्रे.<br>६. मंजूर बदल अर्ज क्रमांक २५०२/२०२१ ची आदेशासहीत प्रत.<br>७. ज्ञापन व नियम नियमावलीची प्रत.<br>८. अर्जदाराच्या ओळखपत्राची छायांकित प्रत व पत्त्याचा पुरावा. |

Asst. Charity Commissioner, Pune

दिनांक : १४/२/२०२२
स्थळ : पुणे

PRINCIPAL
M. E. S.
New English Medium High School
Thergaon, Pune-411 033

New English Medium School, Thergaon, Pune-33, M.E.S.

(अशोक रामचंद्र मोरे)
Millennium Educational Society
Secretary
Ashok More

(2)

मी, उपनिर्दिष्ट श्री. अशोक रामचंद्र मोरे, राहणार फ्लॅट नं. ३०५, बिल्डिंग नं. ७, अंबानगर, धानोरी रोड, धानोरी लेक विश्रांतवाडी पुणे – ४११ ०१५, प्रतिज्ञापूर्वक इकरार करतो की व सांगतो की, वरील अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या उत्तम माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

पुणे येथे प्रतिज्ञापूर्वक इकरार केला.

दिनांक : १४/२/२०२२
स्थळ : पुणे

Ashok

(अशोक रामचंद्र मोरे)

मी अर्जदारास ओळखतो/ओळखते

(संस्थेतर्फे वकील)

Asst. Charity Commissioner Pune

Solemnly affirmed before me that the facts in the application are true to the best of his information and belief by Sau/Shri Ashok R. More who is identified before me by Adv./ID Bhagyashree Bande Whom I personally Known
Date : 14/2/2022

Superintendent
Public Trust Registration Office
Pune Region, Pune

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33. * M.E.S. *

(52)

(3)

मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त-३, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर

बदल अर्ज क्रमांक : ५६५/२०२२
(महाराष्ट्र सा.वि.व्य.अधि. १९५० चे कलम २२)

न्यासाचे नांव : मिलेनियम एज्युकेशनल सोसायटी,
श्रीनगर, थेरगांव, पुणे.

नोंदणी क्रमांक : एफ/ १८३१६ /पुणे.

नि.क्र.१ वरील आदेश
(दिनांक :२४/०३/२०२२)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी मु.सा.वि.व्य.अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये कार्यकारी मंडळामधील बदलाची नोंद परीशिष्ट-१ वर घेणेकरीता दाखल केलेला आहे. अर्ज वादरहित आहे.

२. अर्ज नि.क्र.१ चे अवलोकन केले असता, न्यासाच्या दिनांक २९/०८/२०२१ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सन २०२१ ते २०२६ या कालावधीकरिता कार्यकारी मंडळाची निवड करण्यांत आली. तदनंतर दिनांक ३१/१२/२०२१ रोजी कार्यकारी मंडळाची सभा होवून सदर सभेमध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार या पदाधिका-यांची निवड करणेत आली. त्यानुसार झालेल्या बदलाची नोंद परिशिष्ट एकवर होण्याकरिता प्रस्तुतचा बदल अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्जदाराने अर्जासोबत ज्ञापन व नियमावलीची प्रत, सभेची नोटीस, नोटीस पोहोच, सभेच्या उपस्थितीसह इतिवृत्ताची प्रत, नविन पदाधिका-यांची संमत्तीपत्रे, अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ अर्जदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र, पुरावा संपल्याची पुरसिस इ.कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

Asst. Charity Commissioner * Pune

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33

४. नि.क्र. १ नुसार कळविलेला बदल व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदर बदल हा न्यासाच्या नियम-नियमावलीस अनुसरुन केला असल्यामुळे झालेला बदल वैध व कायदेशीर असल्याचे दिसुन येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करते.

## आदेश

१. बदल अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. परिशिष्ट १ वर नोंद घेण्यात यावी.

ठिकाण :- पुणे
दि :- २४/०३/२०२२.

Asst. Charity Commissioner Pune

24/03/2022

(रा.प्र.मुक्कावार)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त-३
पुणे विभाग, पुणे

सही शिक्क्याची खरी नक्कल

PRINCIPAL
M. E. S.
New English Medium School
Thergaon, Pune-411 033

THERGAON PUNE-33 M.E.S.

मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजवात केली

28.4.2022
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.